Exh. 4

अहमदनगर येथिल मे. चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब
यांचे कोर्टात...

क्रि.केस. नं. /२०२४

SCC 235/2025

____0____
Read and Recorded

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2025.01.21 17:52:46 +0530

फिर्यादी

प्रगत शेतकरी केंद्र चे भागीदार

श्री. महेश पोपटलाल बोरा,

विरुद्ध

आरोपी

श्री. रमणलाल धनराज गांधी

प्रोप्रा- श्री. रमणलाल धनराज गांधी

**या कामी फिर्यादीतर्फे सरतपासाचे शपथपत्र -**

मी, **प्रगत शेतकरी केंद्र चे भागीदार श्री. महेश पोपटलाल बोरा,** वय - ४२ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा. प्लॉट नं. ९५, मार्केटयार्ड, अहमदनगर कारणे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

१) माझी प्लॉट नं. ९५ मार्केटयार्ड, अहमदनगर येथे प्रगत शेतकरी केंद्र या नावाची भागीदारी फर्म आहे. सदरचे फर्म मधून मी शेतीसाठी लागणारे बियाणे व किटकनाशकेची विक्री करतो. सदरचे व्यवसायाबाबतचे किटकनाशके परवाना एलसीआयडी ०८२०२२२२३१ एएचएन ची डिजिटल प्रत दाखल केलेली आहे. त्यावर नोटीफाईड ॲथोरिटी व डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडींग ॲग्रीकल्चर ऑफिसर महाराष्ट्र राज्य, अहमदनगर म्हणून शिवाजीराव श्रीरंग जगताप यांचे नाव आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी देवुन पुराव्याचे कामी वाचणेत यावे. तसेच बियाणे परवाना क्र. एलसीएसडी

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

०२२०२३००५३ एएचएन ची डिजिटल प्रत दाखल केलेली आहे. त्यावर नोटीफाईड ऑथोरिटी म्हणून शिवाजीराव श्रीरंग जगताप यांची सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी देवुन पुराव्याचे कामी वाचणेत यावे. सदर फर्मचे व इतर भागीदार यांचे वतीने महेश पोपटलाल बोरा यांना नोटीसा देणे, फिर्याद दाखल करणे, केसेस चालविणे इत्यादी अधिकार दिलेले आहेत. तसे अधिकारपत्र दाखल केलेले आहे. त्यावर इतर भागीदार निता महेश बोरा व माझी सही आहे.

२) आरोपीची **रमणलाल धनराज गांधी** या नावाने मु.पो. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे दुकान असून आरोपी हे सदरचे दुकानामधून शेतीसाठी लागणारे बियाणे व किटकनाशके विक्री करणेचा व्यवसाय करतात व आरोपीचे दुकानाकरीता लागणारे बियाणे व किटकनाशके आरोपी हे फिर्यादीचे फर्ममधुन खरेदी करीत असत त्यामुळे आरोपीचा व फिर्यादीचा परिचय झाला, ओळख वाढली, दरम्यान आरोपीने फिर्यादी यांना त्यांचे फर्म मध्ये उधारीचे खाते ठेवणेची विनंती केली व त्यांचे फर्म मध्ये उधारीचे खाते ठेवणेची विनंती केली व खाते बाकी पोटी होणारी रक्कम वेळोवेळी देणेचा भरवसा व खात्री दिली. आरोपीशी असलेला परिचय व ओळख लक्षात खात्री दिली. आरोपीशी असलेला परिचय व ओळख लक्षात घेऊन फिर्यादी यांनी आरोपीवर विश्वास ठेवुन त्यांचे फर्म मध्ये आरोपीचे दुकानचे नावे उधारीचे खाते ठेवले व आरोपीने वेळोवेळी सदरचे खात्यावर बियाणे व किटकनाशके उधारीने नेलेले आहे. सदरचे उधारीचे खाते ठेवलेबाबत खाते उतारा दिनांक ०१/०४/२०२४ ते २२/११/२०२४ चा खाते उतारा दाखल केलेला आहे,

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

सदरचा खाते उतारा आरोपीस दिलेला माल व आरोपीने जमा केलेल्या रकमा या प्रमाणे नोंदी घेऊन तयार केलेला आहे. सदरचा खाते उतारा मुळ खाते उता-यावरुन तयार केलेला आहे. सदर खाते उता-याची कॉम्प्युटर प्रत दाखल केलेली आहे, त्यावर आमचे फर्मचा शिक्का आहे, त्यावर माझी सही आहे, सदरचे खाते उता-यावरील नोंदी व मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. सदरचा खाते उतारा हा इलेक्ट्रॉनीक रेकॉर्ड असल्यामुळे भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ प्रमाणे ६३ब सर्टिफिकेट दाखल केलेले आहे, त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी नंबर देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. ०५/०७/२०२४ आर.सी.टी.ई. ०२६४५ युनियन बँक एन.ई.एफ.टी. द्वारे रु. १०००/- खातेबाकीपोटी जमा.

दि. ०६/०६/२०२४ रोजी आरोपीस आमचे फर्ममधून चलन नं. २३२ अन्वये सोयाबीन एक्सलंट वगैरे माल पाठविलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपीचे अधिकृत व्यक्ती महादु साबळे यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

सदरच्या चलनावरुन दि. ०६/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००३६ या बिलान्वये रु. ३३,३९५/- रुपयांचा सोयाबीन एक्सलंट वगैरे माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. ०७/०६/२०२४ रोजी आरोपीने आमचे फर्ममधून चलन नं. २३९ अन्वये घेवडा श्रावणी वगैरे माल नेलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपी यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

सदरच्या चलनावरुन दि. ०७/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००४३ या बिलान्वये रु. १८,९३६/- रुपयांचा घेवडा श्रावणी वगैरे माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

दि. ०७/०६/२०२४ रोजी आरोपीने आमचे फर्ममधून चलन नं. २४० अन्वये कांदा एलोरा वंडर वगैरे माल नेलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपी यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

सदरच्या चलनावरुन दि. ०७/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००४४ या बिलान्वये रु. २९,४३०/- रुपयांचा कांदा एलोरा वंडर वगैरे माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. १०/०६/२०२४ रोजी आरोपीने आमचे फर्ममधून चलन नं. २५४ अन्वये बाजरा दातार ७ हा माल नेलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपी यांचे अधिकृत व्यक्ती महादु साबळे यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

सदरच्या चलनावरुन दि. १०/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००५९ या बिलान्वये रु. १८,०००/- रुपयांचा बाजरा दातार ७ हा माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. १०/०६/२०२४ आर.सी.टी.ई. ०२६४८ युनियन बँक एन.ई.एफ.टी. द्वारे रु. १०,०००/- खातेबाकीपोटी जमा.

दि. १२/०६/२०२४ रोजी आरोपीने फिर्यादीचे फर्ममधून चलन नं. २७२ अन्वये तुर वगैरे माल नेलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपी यांचे अधिकृत व्यक्ती महादु साबळे यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

सदरच्या चलनावरुन दि. १२/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००७६ या बिलान्वये रु. ३५,३००/- रुपयांचा तुर वगैरे माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. १३/०६/२०२४ रोजी आरोपीने आमचे फर्ममधून चलन नं. २७९ अन्वये मका हा माल नेलेला आहे. सदरचे चलनाची मुळ प्रत ही आरोपीचे ताब्यात आहे. सदरच्या चलनावर माल स्विकारले बद्दल आरोपी यांची सही आहे व माल दिल्याबद्दल आमचे फर्मचे क्लार्क दिलीप भागवत सरडे यांची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. सदरचे चलनाची स्थळप्रत सदरच्या केसमध्ये दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

सदरच्या चलनावरुन दि. १३/०६/२०२४ रोजीचे बील नं. ०००८३ या बिलान्वये रु. ४८००/- रुपयांचा मका हा माल आरोपीस दिलेला आहे. सदर बिलाची कॉम्प्युटर प्रत ही आरोपीस दिलेली आहे व सदर बिलाची कॉम्प्युटराईज्ड प्रत आज रोजी दाखल करत आहे. सदरच्या बिलावर आमचे फर्मचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

दि. २०/०६/२०२४ आर.सी.टी.ई. ०२६७६ युनियन बँक एन.ई.एफ.टी. द्वारे रु. ११,०००/- खातेबाकीपोटी जमा.

दि. २२/०७/२०२४ सेल्स रिटर्न पावती नं. डि-०००१६ अन्वये रु. ३,०००/- खातेबाकीपोटी जमा.

दि. १४/०८/२०२४ आर.सी.टी.ई. ०२७५२ युनियन बँक एन.ई.एफ.टी. द्वारे रु. १२,०००/- खातेबाकीपोटी जमा.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

दि. २१/०८/२०२४ सेल रिटर्न पावती नं. डी-०००३५ अन्वये रु. ७२५/- खातेबाकीपोटी जमा.

दि. ०३/०९/२०२४ आर.सी.टी.ई. ०२७६८ युनियन बँक एन.ई.एफ.टी. द्वारे रु. २५,०००/- खातेबाकीपोटी जमा.

दि. १८/११/२०२४ चा चेक नं. ०१६४७० रक्कम रु. ७७,१३६/- आरोपीने दिलेला आहे. सदरचा चेक डिसऑनर झालेला आहे. सदरची रक्कम फिर्यादी यांना मिळाली नसल्याने ती रक्कम जमा झालेली नाही.

सदरची बीले व पावत्या हे इलेक्ट्रॉनीक रेकॉर्ड असल्यामुळे भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ प्रमाणे ६३ब सर्टिफिकेट दाखल केलेले आहे, त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी नंबर देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

३) अशा प्रकारे माझे फर्मचे व आरोपीचे दरम्यान आर्थिक व्यवहार चालू असताना मी आरोपीकडे खाते बाकीपोटी असलेल्या रकमेची मागणी केली असता आरोपीने दि. **१८/११/२०२४** रोजीचा **श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि. निघोज, शाखा - टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर** या बँकेचा चेक क्र. **०१६४७०** या क्रमांकाचा रक्कम रु. **७७,१३६/-** या रकमेचा दिला व सदरचा चेक बँकेत भरलेस चेक पोटी असलेली रक्कम मिळेल असा भरवसा व खात्री दिली.

सदरचा **मुळ चेक** केसमध्ये दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे, ती मी ओळखतो त्यामधील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

४) सदरचा चेक मी आमचे फर्मचे खाते असलेल्या बँकेत म्हणजेच अहमदनगर मर्चंट को.ऑप. बँक लि. अहमदनगर शाखा मार्केटयार्ड, अहमदनगर येथे दि. १८/११/२०२४ रोजी भरला सोबत **चेक बँकेत भरल्याची स्लिप** दाखल केलेली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी देऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. सदरचा चेक फंडस् इनसफिशियन्ट असा शेरा मारुन दि. १९/११/२०२४ रोजी आमचे फर्मचे खातेमध्ये परत आला तसे आमचे फर्मला बँकेने मेमोसहीत पत्र दिलेले आहे. सदरचे **मुळ पत्र** केससोबत दाखल केलेले आहे. त्यावर बँकेचे संबंधीत अधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. म्हणजेच चेक पोटी असलेली रक्कम आरोपीचे खात्यामध्ये शिल्लक नाही हे माहित असून देखील आरोपीने वरील रकमेचा चेक दिला व फिर्यादीची फसवणूक केलेली आहे. वास्तविक चेक भरलेनंतर फिर्यादी यांना चेक पोटी असलेली रक्कम मिळावयास पाहिजे होती, परंतू ती मिळाली नाही.

५) त्यानंतर आमचे फर्ममार्फत मी आरोपी यांना दिनांक **०२/१२/२०२४** रोजी ॲड. ओमप्रकाश समर्थ तिपोळे यांचेमार्फत रजि. पोष्टाने नोटीस पाठविली व चेक पोटी असलेल्या रक्कमेची मागणी केली. सदरची नोटीस आरोपीस दिनांक **०३/१२/२०२४** रोजी मिळाली. सदरच्या **नोटीसीची स्थळप्रत** दाखल केलेली आहे. त्यावर आमचे फर्मचे वकिल ॲड. ओमप्रकाश समर्थ तिपोळे यांची सही आहे, ती मी ओळखतो. सदरचे नोटीसीमधील मजकुर खरा व

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. तसेच रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविलेबाबतची **पोस्टाची पावती** दाखल केली आहे. त्यास निशाणी नंबर देऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. सदरची नोटीस आरोपीस मिळाली. सदरची नोटीस आरोपीस मिळाली. सदरची नोटीस आरोपीस मिळालेबाबत **पोस्टाची पोहोच पावती** दाखल केलेला असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास निशाणी नंबर देऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

परंतु तरीही आरोपीने मला चेकपोटी असलेली रक्कम आणुन दिली नाही. त्यामुळे माझी फसवणुक झालेली आहे. म्हणून आरोपीने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे गुन्हा केलेला आहे. म्हणून आरोपी विरुद्ध मी सदरची फिर्याद दाखल केलेली आहे. सदर फिर्यादीची चौकशी होऊन आरोपींना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे कडक शासन व्हावे हि विनंती.

वरील मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी या खाली सही केली असे.

दि. ९/ ९ /२०२४

अहमदनगर

ओळख — ॲफिडेव्हीट करणार

Solemnly affirmed before me namely by Mahesh Papatlal Bora Age 42 years occu - Business

Who is identified before me by Adv D. U. Kulkarni, R/o Plot No 95, Market yard Ahmednagar

or whom I Personally know.

Dt. 01/01/2025

01.01.25

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar